# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५ / फाल्गुन २७, १९४६ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) उप मुख्यमंत्री**<br>**(२) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री**<br>**(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### मेंढेगिरी समितीच्या शिफारशीनुसार मराठवाड्यासाठी जायकवाडी धरणामध्ये पाणी सोडण्याबाबत

**(१) * ४९ श्री.अंबादास दानवे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेंढेगिरी समितीच्या शिफारशीनुसार मराठवाड्यासाठी जायकवाडी धरणात पाणी सोडण्यासाठी ठरविलेले ६५ टक्क्यांचे सूत्र महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे (मेरी) महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या अभ्यासगटाने बदलून ५८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे ठरविले असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने देखील समन्यायी पाणी वाटप कायदा, २००५ वैध ठरविलेला असून त्यानुसारच जायकवाडी धरणातील पाणी वाटप होत असून, मराठवाडा अतिशय दुष्काळग्रस्त असतानाही जायकवाडी प्रकल्पाचे उर्ध्व भागातून ७ टक्के पाणी कमी देण्याची शिफारस गोदावरी अभ्यास गट समितीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेरी या संस्थेच्या शिफारशीमुळे जायकवाडी धरणात पावसाळ्यानंतर पाणी सोडण्याच्या निकषात बदल केल्याने मराठवाड्याचे हक्काचे पाणी कमी होणार असून याचा परिणाम मराठवाड्याच्या शेती, उद्योग व सर्वसामान्य जनतेवर होणार असून दुष्काळग्रस्त मराठवाडा विभागावर दुजाभाव करण्यात आला असून, सदर अन्यायाविरोधात आंदोलन करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे (मेरी) महासंचालक यांनी सादर केलेला अहवाल न स्वीकारता मराठवाड्यासाठी जायकवाडी धरणामध्ये पूर्वी प्रमाणेच ६५ टक्क्यांनी पाणी सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, (मजनिप्रा), मुंबई यांचेकडील केस क्रमांक-१/२०१४ चे अनुषंगाने दिनांक १९/०९/२०१४ रोजी दिलेल्या आदेशात पैठण (जायकवाडी) धरणात ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवाड्यात ६५ % किंवा त्यापेक्षा जास्त उपयुक्त पाणीसाठा (स्ट्रटेजी-३ नुसार) झाल्यास जायकवाडीच्या वरील धरणातुन पाणी सोडण्याची आवश्यकता नाही, असे नमुद केले आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र.१७३/२०१३ च्या आदेशात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, (मजनिप्रा), मुंबई यांचेकडील केस क्रमांक-१/२०१४ चे अनुषंगाने दिनांक १९/०९/२०१४ रोजी दिलेल्या आदेश ग्राह्य धरण्यात यावे, असे नमुद केले आहे.

मेंढेगिरी समितीच्या दिनांक ०८/०८/२०१३ च्या अहवालानुसार अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा व मधील कालावधीत गोदावरी नदी खोऱ्याच्या जलनियोजनात झालेले बदल विचारात घेऊन मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर दिनांक २६/०७/२०२३ च्या शासन निर्णयानुसार महासंचालक, मेरी नाशिक यांचे अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय अभ्यासगटाची नेमणूक केली होती. या अभ्यास गटाने आपला अहवाल दिनांक १४/१०/२०२४ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, (मजनिप्रा), मुंबई यांना सादर केला आहे. त्यामध्ये सन २०१३ ते २०२२ या कालावधीतील अतिरिक्त माहिती/डाटा च्या आधारे जायकवाडी धरणात पाणी सोडण्यासाठी ठरवलेले ६५% चे प्रमाण बदलून ५८% करण्याची शिफारस केली आहे.

(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १७३/२०१३ च्या आदेशात महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, (मजनिप्रा), मुंबई यांचे कडील केस क्रमांक -१/२०१४ चे अनुषंगाने दिनांक १९/०९/२०१४ रोजी दिलेल्या आदेश ग्राह्य धरण्यात यावे, असे नमुद केले आहे.

तद्नंतर, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २३/०९/२०१६ रोजी दिलेल्या आदेशान्वये प्राधिकरणाच्या सदर आदेशाचे दृढीकरण केले आहे. सदर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशातील परि.१९५ (xi) नुसार प्राधिकरणाने या मार्गदर्शक तत्वांचे (Guiding Principles) काही कालावधीनंतर पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे.

दिनांक २६/०७/२०२३ च्या शासन निर्णयानुसार महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण,जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय अभ्यासगटाची नेमणूक करण्यात आली. या अभ्यासगटाने आपला अहवाल दिनांक १४/१०/२०२४ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, (मजनिप्रा), मुंबई यांना सादर केला आहे. त्यासंदर्भात पुनर्विलोकनाची कार्यवाही महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, (मजनिप्रा) कडे सुरु आहे.

(३) यानुषंगाने, मराठवाडा बचाव समिती, छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचे पत्र दिनांक २५/०१/२०२५ नुसार, सदरील विषयी आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन प्राप्त आहे.

(४) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक यांनी दिनांक १४/१०/२०२४ रोजी प्राधिकरणास सादर केलेला अहवाल प्राधिकरणाने त्यांच्या संकेत स्थळावर (https://mwrra.maharashtra.gov.in) ठेवला असून पुनर्विलोकनाची प्रक्रीया सुरु केली आहे. त्यावर काही अभिप्राय/हरकती असल्यास दिनांक १५/०३/२०२५ पर्यंत मागविल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील खाडी किनारा मार्गासाठी नियमबाह्य कंत्राट देण्यात आल्याबाबत

**(२) * ३५२ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, ॲड.अनिल परब, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील घोडबंदर मार्गाला समांतर उभारण्यात येणाऱ्या खाडी किनारा मार्गासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तिवरांच्या जंगलांची होणारी कत्तल, सागरी किनारा नियमनाचे कठोर कायदे, नौदलाच्या जागेस खेटून उभारणीमुळे संरक्षण विभागाकडून हरकती असताना व सर्व आवश्यक परवानग्या हाती येण्यापूर्वीच सुमारे २७०० कोटी रुपयांचे कंत्राट हे आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच दिले असल्याची बाब दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घोडबंदर मार्गाला समांतर उभारण्यात येणाऱ्या खारेगाव ते गायमुख या १३ कि.मी. लांबीच्या प्रस्तावित खाडी किनारा मार्ग प्रकल्पाच्या खर्चात दुपटीने वाढ झाली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाडी किनारा मार्ग प्रकल्पासाठी केंद्र शासनस्तरावरील आवश्यक असलेल्या परवानग्या अद्यापही मिळालेल्या नसतानाही मुख्य सचिवांनी मे.नवयुगा इंजिनिअर्स या संस्थेची निविदा स्विकारण्यास मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठाणे येथील घोडबंदर मार्गाला समांतर उभारण्यात येणाऱ्या खाडी किनारा मार्गासाठी नियमबाह्य कंत्राट देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली तसेच प्रकल्पामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये याकरीता कोणकोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) ठाणे येथील बाळकुम ते गायमुख या १३.४५ कि.मी. लांबी व रुपये ३३६४.६२ कोटी किंमतीच्या खाडी किनारा मार्ग प्रकल्पाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाच्या एकूण १३.४५ कि.मी. लांबीपैकी ६.६४ कि.मी. लांबीकरीता पर्यावरण विभागाच्या परवानगीची आवश्यकता नाही. सबब, या लांबीकरीता काम सुरु करण्यास कोणताही अडथळा नव्हता. उर्वरित ६.८१ कि.मी. लांबीकरीता पर्यावरण विभागाची परवानगीची आवश्यकता असल्याने सदर

परवानगी प्राप्त करण्याची प्रक्रिया माहे मे, २०२१ पासून सुरु करण्यात आली होती. यामध्ये एकूण १५ टप्प्यांपैकी १४ टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली होती. आता दिनांक ०५/०३/२०२५ रोजी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची अंतिम परवानगी प्राप्त झाली आहे.

सदर प्रकल्पाकरीता संरक्षण विभागाचे (नौदलाचे) ना- हरकत पत्र माहे एप्रिल, २०१६ मध्ये प्राप्त झाल्यानंतर तज्ञ मूल्यांकन समितीने (Expert Appraisal Committee) आखणी मार्गात काही बदल सुचविल्यानंतर नौदल विभागाची माहे मे, २०२४ मध्ये सुधारित आखणी मार्गास परवानगी प्राप्त झालेली आहे.

या प्रकल्पाकरीता ठाणे महानगरपालिकेतर्फे सन २०२१ मध्ये केवळ पर्यावरण मान्यतेसाठी प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. या ढोबळ अंदाजपत्रकाची किंमत रुपये १३१६.१८ कोटी इतकी होती. तद्नंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत या प्रकल्पाचा सन २०२४ मध्ये तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पाची रुपये ३,३६४.६२ कोटी इतकी किंमत होत असून त्यास प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

दिनांक ०२/०९/२०२४ रोजी संपन्न झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत सदर प्रकल्पाकरीता निविदा प्रक्रियेतील लघुत्तम निविदाकार मे. नवयुगा इंजिनिअरिंग कंपनी लि. यांची रुपये २,७२७ कोटी रक्कमेचा निविदा स्विकारण्यास मंजूरी देण्यात आली. त्यास अनुसरुन दिनांक १८/१२/२०२४ रोजी सदर प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरिवली (मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण न करणाऱ्या विकासकाविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३) * २६० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरिवली (मुंबई) येथील एक्सर गाव परिसरातील भूखंड क्र.१७९ येथे श्रीनिवास डेव्हलपर्समार्फत बोरेभाट सहकारी गृहनिर्माण झोपडपट्टी पुनर्वसन योजना दिनांक ११ जून, २००४ मध्ये झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाकडे दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत सन २०११ मध्ये विकासकाने दोन इमारतींमध्ये २६४ पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन केले असून उर्वरित झोपडीधारकांचे अदयाप पुनर्वसन केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाने १२ हजार ४६७.३० चौरस मीटरचा मोकळा भूखंड महानगरपालिकेला हस्तांतरित करणे बंधनकारक असतानाही तसे न करता तसेच कॉलेज इमारतीचे बांधकामदेखील अपूर्णावस्थेत असून विकासकाने विक्री घटकाच्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र, अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र व उद्वाहन पूर्णत्व प्रमाणपत्र घेतले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याच विकासकाने यापूर्वी कांदिवली (पूर्व) येथील साईश्रध्दा सहकारी गृहनिर्माण संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण न केल्याबददल व झोपडीधारकांचे भाडे थकविल्याने चारकोप पोलीस ठाण्यात माहे जानेवारी, २०२५ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन योजना पूर्ण न करता विक्री करावयाच्या इमारतीच्या बांधकामाला प्राधान्य देणाऱ्या विकासकाविरुध्द झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने कारवाई करण्याचा निर्णय घेऊन अनधिकृत काम करणाऱ्या, झोपडपट्टी पुनर्वसन योजना वेळेत पूर्ण न करणे, झोपडीधारकांचे भाडे थकित ठेवणे याकरीता विकासकावर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर योजनेत एकूण ४८० पात्र झोपडीधारक आहेत. त्यापैकी पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन हे पुनर्वसन इमारत क्र. १ व २ मध्ये सन २०११ रोजी करण्यात आले आहे. उर्वरित २१३ पात्र झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन अद्याप केलेले नाही.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

नभूक्र. १११, १११/१ ते ३५, मौजे मालाड, कांदिवली (पश्चिम), मुंबई या भूभागावरील साई श्रध्दा एसआरए सह. गृह संस्था मर्या. या योजनेमधील झोपडीधारकांचे भाडे थकीत ठेवून पुनर्वसन इमारतीचे बांधकाम पूर्ण न करता विक्री इमारतीचे काम पूर्ण करण्यास प्राधान्य देत असल्याने विकासक मे. सी. जी. हौसिंग इन्फ्रा प्रा. लि. यांचे विरुध्द दिनांक २५/०६/२०२४ रोजी झो.पु. प्राधिकरणामार्फत कांदिवली पोलीस ठाणे येथे प्रथम खबर क्र.०५५१/२०२४ अन्वये प्रथम खबर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. प्रश्नांकित योजनेचा विकासक व साई श्रध्दा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा विकासक हे वेगवेगळे आहेत.

तसेच बोरभाट एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था, बोरिवली येथील योजनेचे विकासक मे. श्रीनिवास डेव्हलपर्स यांनी झोपडीधारकांचे पुनर्वसन न करता विक्री घटकाचे इमारतीचे बांधकाम केले बद्दल दिनांक ०६/०१/२०२५ रोजी सदर विकासकाविरुध्द झो.पु. प्राधिकरणामार्फत बोरीवली पोलीस ठाणे येथे प्रथम खबर क्र.००३१/२०२५ अन्वये प्रथम खबर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) अशा प्रकारच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या विकासकांविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ मधील कलम १३(२) अंतर्गत विकासकांची नियुक्ती रद्द करणेबाबत कारवाई करण्यात येत आहे व अशा विकासकांना काळ्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील धोम धरण डावा कालव्याच्या अस्तरीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४) * ९७५ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुमाळवाडी-नांदगिरीत (ता.कोरेगाव, जि.सातारा) गतवर्षी धोम धरण डावा कालवा फुटलेला असताना त्याची गंभीर दखल घेत लोकप्रतिनिधीनी डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणासाठी सन २०२४ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधीची मागणी केल्यावर तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री यांनी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे ४० वर्षापूर्वी बांधलेल्या धोम धरणाचे काम अत्यंत कमकुवत झाले असून अनेक ठिकाणी भराव जीर्ण झाल्याने तसेच कालव्याचे अस्तरीकरण पूर्णपणे नष्ट झाल्याने गेल्या काही वर्षांत कालवा फुटण्याच्या घटना घडत असल्यामुळे पाण्याचे आवर्तन मध्येच बंद करावे लागत असून परिणामी, शेती सिंचनाचे वेळापत्रक कोलमडून सिंचन व्यवस्थेवर ताण येत असून शेतीचेही नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री यांनी डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणासाठी मंजूर केलेला ५० कोटी रुपयांचा निधी वितरीत करुन काम पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

जलसंपदा विभागाच्या महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम (MIIP) अंतर्गत टप्पा-२ मध्ये धोम प्रकल्पास रुपये ५० कोटी किंमतीस दिनांक १४/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे.

धोम धरण व कालव्याचे बांधकाम सन १९७२ ते १९७६ या कालावधीत पूर्ण झाले असून त्यास साधारणत: ५० वर्षे झाली आहेत. त्यामुळे कालवा भराव कमकुवत व बांधकामे जीर्ण झाली असल्याने कालवा फुटी/गळती या घटना घडून सिंचन आवर्तनात अडथळे येत आहेत.
(३) महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम (MIIP) अंतर्गत टप्पा २ मध्ये धोम प्रकल्पास रुपये ५० कोटी किंमतीस मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये कालव्यावरील धोकादायक स्थितीत असलेल्या बांधकामांची दुरुस्ती तसेच निवडक अस्तरीकरण प्रस्तावित आहे. त्यानूसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत असून मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) * ७९९ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियानांतर्गत सन २०२५ पर्यंत संपूर्ण देश क्षयरोगमुक्त करण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाद्वारे निश्चित केल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई येथील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या महानगरपालिका संचलित शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात प्रशासनातर्फे आवश्यक सेवा सुविधा देण्याबाबत व तज्ज्ञ मानव संसाधनाच्या उपलब्धतेबाबत शासनाकडून दिरंगाई केली जात असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गत पाच वर्षांमध्ये या रुग्णालयातून उपचार घेताना रुग्ण बेपत्ता झाल्याच्या अथवा पळून गेल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयात सेंटर ऑफ एक्सलेन्स विकसित केल्यास क्षयरोगाच्या निदानापासून ते रोगमुक्त होईपर्यंतचा पूर्ण उपचार नागरिकांना मिळु शकणार असल्याने असे सेंटर ऑफ एक्सलेन्स विकसित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्र शासनाद्वारे सन २०१८ मध्ये "क्षयरोगमुक्त भारत" अभियान संपूर्ण भारतात सुरू करण्यात आले असून याद्वारे सन २०२५ पर्यंत क्षयरोगमुक्त भारत हे उद्दिष्ट घेण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी येथे रुग्णसेवा देण्यासाठी विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार (Speciality Medical Consulatant), वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी (Senior Medical Officer), वैद्यकीय अधिकारी (Medical Officer) व शल्यचिकित्सक (Surgeon) या संवर्गातील एकूण मंजूर ४५ पदांपैकी २० पदे कार्यरत असून २५ पदे रिक्त आहेत. तसेच, ३३ पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सेंटर ऑफ एक्सलेन्स विकसित करण्यासाठी अधिष्ठाता, लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७/१०/२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार क्षयरोग रुग्णालय, शिवडी येथे मध्यवर्ती संदर्भ प्रयोगशाळा (Intermidiate Reiferal Laboratory) बाल क्षयरोगकक्ष अद्ययावत शस्त्रक्रियागार (Modular operation Theatre), १० खाटांचे उरोरोग अतिदक्षता विभाग (Intensive Respiratory care Unit IRCU), फुफ्फुसिय पुनर्वसन केंद्र (Pulmonary Rehabitation Centre - PRC), २४/७ क्ष-किरण सुविधा, क्लिष्ट आजार असलेल्या क्षयरुग्णांसाठी Echo India सारख्या उपक्रमाशी संलग्नता, क्षयरोग बरा झालेल्या परंतु फुफ्फुसे निकामी झालेल्या क्षयरुग्णासाठीचा कक्ष (Palliative Ward) District Residency Programme द्वारे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या डॉक्टरांची क्षयरोग रुग्णालयात नियुक्ती यांसारख्या सेवा-सुविधा सुरु करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निळवंडे धरणाच्या (ता.अकोले, जि.अहिल्यानगर) लाभक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांना पाण्याचा लाभ देण्याबाबत

**(६) * ३४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निळवंडे धरणातील (ता.अकोले, जि.अहिल्यानगर) डाव्या व उजव्या कालव्यातील पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत बंदिस्त जलवाहिनीतून पोहोचविण्याचा प्रकल्प शासनाने मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पामध्ये केवळ लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले असून, लाभक्षेत्राबाहेरील शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश करण्याची मागणी लोकप्रतिनिधींसह विविध संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निळवंडे कालव्याच्या सरसकट अस्तरीकरणास तालुक्यातील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असून, धरणाचे आवर्तन सुरू असताना डाव्या कालव्यात अनेक ठिकाणी गळती असल्याने कालव्याच्या बाजूला असलेल्या शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या उपरोक्त मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) होय, हे अंशतः खरे आहे.

निळवंडे प्रकल्पाच्या पाचव्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावामध्ये मुख्य कालवे व शाखा कालव्यांच्या संपूर्ण लांबीमध्ये अस्तरीकरण तसेच वितरण व्यवस्थेचे काम बंदिस्त नलिका प्रणालीमध्ये करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. पाणी उपलब्धतेबाबतचे व्यस्त प्रमाण याचा विचार करता पाण्याचा ऱ्हास टाळून इष्टतम वापर करणेकरीता प्रकल्पाच्या दोनही मुख्य कालवे व डाव्या कालव्यावरील चारही शाखा कालवे यांना अस्तरीकरण कामे प्रगतीत आहेत. त्यामुळे ठराविक ठिकाणी कालवा अस्तरीकरण न करण्याची मागणी पूर्ण करणे शक्य होणार नाही.

अकोले तालुक्यात उजव्या व डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे सद्य:स्थितीत प्रगतीपथावर आहेत. अकोले तालुक्यात डोंगराळ भागातून सछिद्र खडकातून कालवे जातात. यापैकी कालवे जात असलेल्या म्हाळादेवी, निंब्रळ, मेहंदुरी, कळस, रुंभोडी व सुलतानपूर या ठिकाणी पाण्याचा पाझर होत होता.म्हाळादेवी, निंब्रळ, मेहंदुरी व रुंभोडी या भागात कालवा अस्तरीकरण झालेल्या ठिकाणी पाण्याचा पाझर बंद झालेला आहे. तसेच, उर्वरित कळस व सुलतानपूर येथे अस्तरीकरण कामे पूर्ण झाल्यावर कालव्यामधून होणारा पाण्याचा पाझर पूर्णपणे बंद होणार आहे.

उर्ध्व प्रवरा प्रकल्प (निळवंडे २) डावा व उजव्या कालव्याच्या मंजूर काटछेदाप्रमाणे कालव्याच्या दोन्ही बाजूने नाली (Drain) प्रस्तावित आहे. सदर नाली खोदकाम करण्यास शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे कालव्या लगतच्या नालीचे काम सलगतेने होऊ शकलेले नाही. कालव्या लगतच्या नालींचे काम पूर्ण करून सदर पाणी नैसर्गिक ओढे नाले यामध्ये सोडणे करीता अतिक्रमित ओढे नाले खुले करणेसाठी महसूल विभागाकडे पाठपुरावा क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

उर्ध्व प्रवरा (निळवंडे-२) प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्यामधुन पाणी चाचणी दरम्यान झालेला पाझर विचारात घेवुन शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान भरपाई देण्याबाबत रुपये ३७.०८

लक्ष किमतीच्या प्रस्तावास महामंडळाने नियामक मंडळाच्या ८३ व्या बैठकीत मान्यता दिली आहे. त्यानुसार नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात म्हाडाच्या हजारो घरांची विक्री झाली नसल्याबाबत

**(७) * १८५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) विविध मंडळांतर्फे अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी घरांची सोडत काढली जात असून, सदर घरे बाजार भावापेक्षा कमी किंमतीत खरेदी करण्याची ग्राहकांना संधी असते, तरीही म्हाडातर्फे देण्यात येणारी घरे ही सामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेरील किंमतीची असल्याने म्हाडा प्रशासनावर ४०० पेक्षा जास्त घरांची किंमत कमी करावी लागली असल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील कुर्ला (पश्चिम), विद्याविहार (पश्चिम), मानखुर्द येथील म्हाडाच्या इमारतीतील सदनिकांचे अद्याप वितरण करण्यात आले नसून या इमारती वापराविना असल्याने इमारती मोडकळीस आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात म्हाडाची सुमारे तीन हजार कोटींहून अधिक किंमतीची १२,२३० घरे विक्रीविना शिल्लक असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत काही वर्षांपासून कोकण विभागासह पुणे, नागपूर, नाशिक, अमरावती आणि छत्रपती संभाजीनगर येथील म्हाडाच्या घरांची विक्री होत नसून वारंवार सोडत काढून वा 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' योजनेत त्यांचा समावेश करूनही या घरांची विक्री झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, म्हाडाच्या यापुढे निघणाऱ्या सर्वच सोडतीतील घरांच्या किंमती या सामान्य ग्राहकांना परवडतील अशा पध्दतीने करण्यासाठी शासनाने समिती नेमली असून, त्या माध्यमातून किंमती ठरविताना पुनर्विचार करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, म्हाडाच्या विक्रीविना शिल्लक असलेल्या कोट्यवधी रुपये किंमतीच्या घरांची विक्री करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) अंतर्गत कुर्ला (पश्चिम) व नेहरू नगर कुर्ला, मुंबई येथील १४ सदनिकांचा समावेश सोडतीमध्ये करण्यात आला असून सदनिका वाटपाची कार्यवाही सुरू आहे. तसेच नेहरू नगर, कुर्ला येथील २१ सदनिकांचा समावेश करण्यात आलेल्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र अप्राप्त असल्याने सदनिकांचे वाटप अद्याप करण्यात आलेले नाही.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

(५) शासन स्तरावर कोणतीही समिती नेमण्यात आलेली नाही. तथापि, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत विक्री किंमत नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने अभ्यास समितीचे गठन करण्यात आले आहे.
(६) म्हाडामार्फत अभिन्यासांमधील सदनिकांचे सोयी सुविधा शुल्क कमी करण्यात आले आहे. तसेच सदर अभिन्यासांमध्ये रहिवाश्यांसाठी दवाखाने, शाळा, सुपर मार्केट, क्लब हाऊस, विविध उपयोगी हॉल अशा विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे विशेष मोहिमेचे आयोजन करून जाहिरातीद्वारे मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी करण्यात येत आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) नगर पंचायतीमध्ये बायोमायनिंग ई-निविदा प्रक्रियेमध्ये नियमांचे उल्लंघन केल्याबाबत

**(८) * ९३० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) नगर पंचायतीमध्ये घनकचरा व्यवस्थापन अनुषंगिक बायोमायनिंग ई-निविदा प्रक्रिया नियमांचे उल्लंघन करुन तयार करण्यात आली असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाचे प्रधान सचिव व जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक १३ जून, २०२४ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीन्वये ई-निविदा प्रक्रियेमध्ये नियमांचे उउल्लंघन करणाऱ्या संबंधितांवर व निधीचा अपव्यय करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.
सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग व जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे दिनांक १३/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तक्रार केली आहे.
(२) प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे प्राप्त दिनांक १३/०१/२०२५ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने, सदर प्रकरणी विभागाच्या दिनांक २५/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील गावदेवी हाईट्स (डोंबिवली) (प.) या गृहनिर्माण संस्थेच्या विकासकाने रहिवाशांची फसवणूक केल्याबाबत

**(९) * ८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (प.) (जि.ठाणे) येथील गावदेवी हाईट्स या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विकासकाने बनावट कागदपत्रांद्वारे रेरा प्रमाणपत्र घेऊन सुमारे ५० ते ६० रहिवाशांची फसवणूक केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेस इमारत रिक्त करण्याची नोटीस कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने बजाविली असून शासनाने उक्त इमारतीतील रहिवाशांना दिलेली नोटीस मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, शासनाने गावदेवी हाईट्स या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या विकासकांविरोधात कारवाई करण्याबाबत तसेच महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे रोखण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील डोंबिवली पश्चिम येथील गावदेवी हाईटस तळ+७ या अनधिकृत बांधकामधारकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६० व २६७(१) अन्वये बांधकामाच्या अधिकृततेबाबत कागदपत्रे सादर करण्याचे कळविले होते.

सदर प्रकरणी बांधकामधारकाने कोणताही प्रतिसाद/लेखी अथवा तोंडी/ अन्य कागदपत्रे सादर केली नसल्याने, महानगरपालिकेने सदरहु बांधकाम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६०(२) व ४७८ अन्वये अनधिकृत असल्याचे घोषित केले.

सदरचे अनधिकृत बांधकाम १५ दिवसात स्वखर्चाने निष्कासित करण्याचे बांधकाम धारकास कळविले होते. बांधकाम धारकाने उक्त अनधिकृत बांधकाम निष्कासित न केल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६८(१)(अ) अन्वये दिनांक ११/०१/२०२३ व दिनांक ०३/१२/२०२४ रोजी सदर इमारत रहिवासमुक्त करण्याची कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नोटिस दिलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(३) संबंधित अनधिकृत बांधकामधारकाने महानगरपालिकेच्या आदेशाचे पालन न केल्याने, त्यांच्याविरूध्द स्थानिक पोलीस स्थानकात गुन्हा रजिस्टर क्र.००१२/२०२३ दाखल करण्यात आलेला आहे. पोलीस तपासात अनधिकृत बांधकामाचे आरोप सिध्द झाल्याने, आरोपाविरोधात मा.न्यायालयात दोषारोप सादर करणेकरीता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आलेली आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रभागक्षेत्र कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकामांविरूध्द विहीत केलेल्या कार्यप्रणालीनुसार (S.O.P.) निरंतर कार्यवाही करण्यात येते.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या १० प्रभागक्षेत्रात "प्रभागक्षेत्र अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी" यांच्या अधिपत्याखाली अनधिकृत बांधकामाविरूध्द गठीत करण्यात आलेल्या अतिक्रमण विरोधी पथकामार्फत दैनंदिन निरंतर कारवाई करण्यात येते.

अनधिकृत बांधकामांवर उपलब्ध होणाऱ्या पोलीस बंदोबस्तात वेळोवेळी निष्कासनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या घाणेवाडी जलाशयाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०)** * **२५६ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरास पाणीपुरवठा करणारा १४४० कोटी लीटर पाणी साठवण क्षमता असलेल्या घाणेवाडी ह्या निजामकालीन तलावाची सन १९२५ मध्ये निर्मिती झाली असून, सदर तलावातून शहरातील जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत येणारे पाणी नैसर्गिकरित्या आणले जात असून पाणी उपसावरील वीज देयकाचा खर्च निरंक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना शहरास पाणीपुरवठा करणारी ही महत्वपूर्ण योजना असताना तलावाच्या देखभाल दुरुस्तीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून तलावाची संरक्षक भिंत आणि सांडव्याची दुरवस्था झाल्याने पावसाळयात लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सामाजिक संस्थांनी सन २०१० पासून तलावातून ५ लाख ट्रॅक्टर गाळ काढल्यामुळे अतिरिक्त ६१ कोटी लीटर पाणी साठवण क्षमतेत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जलाशयाचे पुनरुज्जीवन होण्यासाठी शासनाने संरक्षक भिंतीची तसेच सांडव्याच्या झालेल्या दुरवस्थेची पाहणी करुन सदर तलावाची दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

जालना शहरास पाणीपुरवठा करणारा १२ द.ल.घ.मी. क्षमतेचा घाणेवाडी तलाव निजामकालीन काळातील आहे. या तलावापासून १० कि.मी. अंतरावरील जालना शहरास ६२५ मी.मी. व्यासाच्या आर.सी.सी. पाईपलाईन द्वारे गुरुत्वदाबाने ९.०० एम.एल.डी. क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी आणून पाणीपुरवठा केला जातो. याकरीता विजेचा वापर होत नाही.

तथापि, या तलावाच्या पाण्याची पातळी १८ फुटावरुन १० फुटापर्यंत आल्यावर बुस्टर पंपाद्वारे तलावाजवळच बांधलेल्या बि.पी.टी. मध्ये पंपींगद्वारे पाणी उचलावे लागते. याकरीता येणारे वीज देयक महानगरपालिकेतर्फे भरण्यात येते.

(२) हे खरे नाही.

तलावातील सांडव्याद्वारे पावसाळयात वाया जाणाऱ्या पाण्यास अटकाव करण्यासाठी सदर तलावाच्या सांडव्याची दुरुस्ती, तसेच आवश्यक ठिकाणी पिचींगची कामे पावसाळयापूर्वी महानगरपालिकेतर्फे करण्यात आली आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) सांडव्याद्वारे पावसाळयात पाणी वाया जावू नये, याकरीता सन २०२४ मध्ये सदरील सांडव्याची आवश्यक दुरुस्तीची कामे महानगरपालिकेतर्फे करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर येथे संत नामदेव महाराजांच्या स्मारकाचे काम सुरू करण्याबाबत

**(११) * ५९१ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२५ मध्ये संत नामदेव महाराजांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा पंढरपूर येथे साजरा होणार असल्याने तीर्थक्षेत्र पंढरपूर येथे शासनाने मंजूर केलेल्या रुपये १५ कोटींच्या संत शिरोमणी नामदेव महाराज स्मारकाचे काम तातडीने सुरू करावे अशी मागणी अखिल भारतीय नामदेव छत्रीय महासंघाने केली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संत शिरोमणी नामदेव महाराज स्मारकाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) अंशत: खरे आहे.

(२) दिनांक १२/०९/२०१४ च्या शासन निर्णयान्वये "देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, पालखीतळ, नेवासा क्षेत्रातील मूलभूत सुविधा निर्माण करण्याच्या सुधारित विकास आराखड्या" मध्ये "श्री संत नामदेव महाराज यांचे भव्य स्मारक बांधणे" या कामासाठी रुपये १५ कोटीच्या निधीस मान्यता देण्यात आली होती. तथापि, जागेअभावी हे काम सुरू करण्यात आले नव्हते. आता दिनांक ३१/०१/२०२५ रोजी जागा प्राप्त झाली आहे. आता याबाबतची पुढील कार्यवाही विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात पदभरती करण्याबाबत

**(१२) * २०८ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात यंत्रसामुग्री व वाहने उपलब्ध आहेत, परंतु मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे अग्निशमन विभागातील ३५० पदांची भरती प्रक्रिया लवकरच होणार असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती ही संबंधित महानगरपालिकेची जबाबदारी असून आपत्कालीन सेवांमध्ये अग्निशमन विभागाची मुख्य भूमिका असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करुन अग्निशमन विभागातील रिक्त असलेल्या पदांची भरती करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नागपूर महानगरपालिकेमध्ये अग्निशमन व आणीबाणी या विभागाकरीता ५ संवर्गातील ३५० पदांच्या पदभरतीसाठी दिनांक ०५/१२/२०२३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रकाशित करण्यात आली तथापि, सेवाप्रवेश नियमामध्ये सुधारणा आवश्यक असल्याने सुधारित जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत संचालक, अग्निशमन सेवासंचालनालय यांनी दिनांक २२/१२/२०२३ च्या पत्रान्वये महानगरपालिकेस सूचना करण्यात आली. यानुषंगाने नागपूर महानगरपालिकेद्वारे दिनांक २०/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये नागपूर महानगरपालिका अग्निशमन व आपत्कालीन सेवा भरती नियमांत सुधारणा करणेबाबत शासनास विनंती करण्यात आली आहे.

विभागाद्वारे राज्यातील अग्निशमन सेवेकरीता एकत्रित सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर कार्यवाही अंतिम टप्प्यात असून याबाबत आवश्यक मान्यता घेऊन सुधारित नियमावली प्रसिध्द करण्याची कार्यवाही विभागाद्वारे करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण डोंबिवली महानगपालिकेकडून देण्यात आलेल्या अनधिकृत बांधकाम परवानग्यांची चौकशी करण्याबाबत

**(१३) * ६३१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका चटईक्षेत्र व्यवहारात मोठ्या प्रमाणात होत असलेला गैरव्यवहार, अनधिकृत ८ व्या मजल्यांना बांधकाम परवानगी, पुनर्बांधणी प्रकल्प गैरव्यवहारांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या पत्राद्वारे प्रधान सचिव, नगरविकास (१) यांना करुनही अदयाप कोणतीही कारवाई केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मागणीनुसार पुनर्वसन प्रकल्पाकरीता चटई क्षेत्रामध्ये वाढ करण्याची अधिसूचना प्रसिध्द झाली असून, सदर अधिसूचना देखील आचारसंहितेचा भंग करणारी असून आचारसंहिता दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीपासून लागू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेने त्यापूर्वीच पुनर्वसन प्रकल्पांकरीता शासनाच्या मंजूर युडीसीपीआर नुसार मर्यादेपेक्षा वाढीव एफएसआय दिल्याने व तदनंतर विदयमान आयुक्तांनी याप्रकरणी शासनाकडे मार्गदर्शन मागविले असतानाही आणि वाढीव एफएसआय अनुज्ञेय नसताना सदर परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने नियमांचे उल्लंघन करुन दिलेल्या परवानगीस स्थगिती देण्याबाबत तसेच यासाठी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) श्री.मनोज भालचंद्र कुलकर्णी यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि-१) यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २४/१०/२०२४ रोजीच्या निवेदनाची प्रत नगर रचना संचालनालयास पृष्ठांकित केली आहे. अर्जदार यांनी सदर पत्राद्वारे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम मंजुरीबाबत आक्षेप घेतले आहेत.
(२) द इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्स व आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी शासन नगरविकास विभागास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासन नगरविकास विभागाने मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मध्ये विनियम क्र. ७.६ च्या विद्यमान तरतुदीमध्ये सुधारणा करणेसंदर्भात उक्त अधिनियमाचे कलम ३७(१कक)(क) अन्वये दिनांक १५/१०/२०२४ रोजी सूचना आम जनतेकडून सूचना/ हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द केली आहे. सदर सूचनेच्या अनुषंगाने प्राप्त सूचना/हरकतींवर सुनावणी देऊन त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना नियुक्त अधिकारी म्हणून नेमणुक केली आहे. नियुक्त अधिकारी यांचा अहवाल व त्यावर संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अभिप्राय विचारात घेवून त्यावर निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे. तसेच सदरची सूचना आचारसंहिता लागण्यापुर्वी निर्गमित केली आहे.
(३) व (४) श्री.मनोज भालचंद्र कुलकर्णी यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि-१) यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २४/१०/२०२४ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालय व नगररचना संचालनालयाकडून माहिती मागविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक महानगरपालिकेत भूसंपादन प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१४) * ३६३ श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेमध्ये सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या कालावधीत भूसंपादन प्रक्रियेमध्ये रुपये ८०० कोटींचा गैरव्यवहार झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ज्यांनी वीस वर्षांपूर्वी मोफत जागा दिली त्यांना प्राधान्याने मोबदला देण्याऐवजी सहेतुक ११ विशिष्ट विकासकांना माहे जून, २०२४ मध्ये रुपये ५५ कोटींचा मोबदला दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूसंपादन प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रस्तुत प्रकरणी मा.विधानसभा सदस्य ॲड. श्री.राहुल उत्तमराव ढिकले यांचे दिनांक १७/१२/२०२४ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.
(२) मागील सन २०१४-१५ चे सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत विकास योजना रस्त्याचे कामासाठी खाजगी जमिनमालकांचे रस्त्याने बाधित क्षेत्र त्यांचे संमतीने महानगरपालिकेने ताब्यात घेतले आहे. याच प्रयोजनासाठीचे विविध भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले असून

ते विविध टप्प्यावर कार्यरत आहेत.

सन २०२४ मध्ये साधारणतः सुमारे ५५ कोटी रुपयांचे भूसंपादनामध्ये बहुतांश भूसंदर्भ दावे, न्यायालयीन आदेशामधील प्रस्ताव व काही मनपाचे अत्यावश्यक बाबीतील प्रस्ताव यांचा समावेश आहे. अशा भूसंपादन प्रस्तावांना महानगरपालिकेने मंजुरी दिलेली आहे. त्यामध्ये विविध ११ प्रस्तावांचा समावेश असून बहुतांश प्रस्तावामध्ये भूसंपादनाची प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण झालेली होती. तदनंतर सदर प्रस्तावात भूसंदर्भ दावे दाखल झालेले होते. त्यामधील मा.न्यायालयाच्या आदेशानुसार वाढीव मोबदल्याच्या रकमा जमा करण्यात आलेल्या आहेत.

तसेच अत्यावश्यक प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये भूसंपादन कार्यालयाकडे कलम १९ अंतर्गत अधिसूचना प्रसिध्द करणेसाठी रक्कम जमा करण्यात आली आहे. वर नमूद प्रमाणे सदर ५५ कोटी मधील विविध प्रस्तावांची रक्कम मा.न्यायालय तसेच संबंधित भूसंपादन अधिकारी यांचेकडे जमा करण्यात आलेली असून कोणत्याही वैयक्तिक भूधारक अथवा विकासक यांना देण्यात आलेली नाही.
(३) व (४) मा.विधानसभा सदस्य अॅड. श्री.राहुल उत्तमराव ढिकले यांचे दिनांक १७/१२/२०२४ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन दिनांक ०३/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये नाशिक महानगरपालिकेस वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले असून त्यास अनुसरुन सदर प्रस्तावांची महानगरपालिका स्तरावर तपासणी करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## शिवाजी पार्क, दादर (मुंबई) येथील मैदान कायमस्वरूपी धूळ मुक्त करण्यासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१५)** * **१०९३ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (मुंबई) येथील शिवाजी पार्क मैदानात क्रिकेटच्या खेळपट्टयांवर दैनंदिन सराव आणि सामने होत असून फेरफटका मारण्यासाठी अनेक नागरिक येत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मदतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेने मैदानात हिरवळ कायम ठेवणे, धूळ उडण्याचे प्रमाण कमी करणे यासाठी शिवाजीपार्कचे नुतनीकरण करण्याचा निर्णय आठ ते नऊ वर्षांपूर्वी घेतल्याचे दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णय आठ ते नऊ वर्षापासून प्रलंबित असून सदर प्रकल्प कार्यान्वित न करताच त्याऐवजी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मातीकाम व अन्य कामांबाबतचा प्रस्ताव भारतीय तंत्रज्ञान संस्था (आय.आय.टी), मुंबई यांचेकडे पाठविला असून त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल असे आयुक्त, महानगरपालिका यांचेकडून सांगण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी आयआयटी, मुंबई यांच्याकडून अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास त्यानुषंगाने कोणती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत आहे, तसेच मैदान कायमस्वरूपी धूळमुक्त करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

शिवाजी पार्क नुतनीकरणाबाबत निर्णय घेण्यात आला नाही. तथापि, स्थानिक रहिवाशांकडून धुळीच्या प्रदूषणाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नियुक्त सल्लागाराच्या अहवालानुसार शिवाजीपार्क येथील मैदानात सन २०२०-२१ व इतर वर्षात मैदानात हिरवळ कायम ठेवणे, धुळ उडण्याचे प्रमाण कमी करणे याकरीता पर्जन्य जलवाहिनीचे जाळे (Perforated pipes covered with geotextile membrane), ३५ रिंगवेल बांधणे, मैदान समतल करणे, लाल माती टाकणे, गवत / लॉन लावणे अशी कामे करण्यात आली.

(२) शिवाजी पार्क येथील धुळीच्या समस्येबाबत महाराष्ट्र राज्य प्रदूषण मंडळाने दिनांक २०/०३/२०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार आय.आय.टी. मुंबई यांची दिनांक ०२/०९/२०२४ रोजी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली. आय.आय.टी. मुंबई यांनी शिवाजी पार्क येथील मातीच्या विविध नमुन्यांची चाचणी करुन दिनांक २८/०१/२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस अंतरिम अहवाल सादर केला.

(३) आय.आय.टी. मुंबई यांच्या अंतरिम अहवालाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शिवाजी पार्क मैदानामध्ये धुळीवर नियंत्रण राखण्याकरीता दररोज रात्री पिण्या अयोग्य पाण्याची फवारणी (Sprinkling) करण्यात येते. सल्लागार संस्थेकडून अद्याप अंतिम अहवाल प्राप्त झाला नाही.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी (जि.पुणे) येथील महानगरपालिकेच्या आरक्षित जागेवर अनधिकृत गुंठेवारी करुन विक्री होत असल्याबाबत

**(१६) * १०७० श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी (जि.पुणे) या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत गुंठेवारी करून नागरिकांना प्लॉटची विक्री केली जात असल्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त,पुणे महानगरपालिका यांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या आरक्षित जागेवर तसेच हील टॉप हील स्लोप जागेवर सदरची अनधिकृत गुंठेवारी करण्यात आली असून मोठमोठे डोंगर सपाट करून त्यातील मुरुमाचे उत्खनन केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत प्लॉटींगची नागरिकांना विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी स्थानिक प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनावर आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना लोकप्रतिनिधीनी माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत गुंठेवारी करुन सदर प्लॉट सर्वसामान्यांना विकून त्यांची फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य श्री.योगेश टिळेकर यांनी दिनांक ०९/०१/२०२५ रोजी कोंढवा, येवलेवाडी, पिसोळी येथील अनाधिकृत प्लॉटिंगबाबत तसेच मुरुमाचे उत्खनन केले जात असल्याबाबत पुणे महानगरपालिकेस निवेदन दिले आहे.

(२) कोंढवा येवलेवाडी येथील आरक्षित जागेवर तसेच हिल टॉप हिल स्लोप जागेवर पुणे महानगरपालिकेमार्फत तसेच तहसिल हवेली कार्यालय यांचेमार्फत कोणतीही गुंठेवारीसाठी परवानगी देण्यात आलेली नाही.

उक्त जागेवर अनाधिकृत उत्खननाबाबत तहसिल, हवेली यांनी वेळोवेळी तात्काळ पंचनामा करुन दंडात्मक कारवाई केलेली आहे. यापुढे अशी बाब आढल्यास कारवाई करण्याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच माती व मुरुम अनाधिकृत उत्खननाबाबत पंचनाम्यानुसार सुनावणीची कार्यवाही सुरु आहे.

(३) अनधिकृत प्लॉटींग व प्लॉटींगमधील कॉक्रीट रस्ते यावर बांधकाम विकास विभाग, पुणे महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करणेत येत आहे.

(४) होय, हे खरे आहे.

म.वि.प.स. श्री.योगेश टिळेकर यांचे दिनांक ०९/०१/२०२५ रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे (खणिकर्म शाखा येथे प्राप्त झाले असून सदर निवदेनावर जिल्हाधिकारी यांनी चौकशीअंती कार्यवाही करण्याअंती दिनांक १६/०१/२०२५ रोजीने तहसिलदार हवेली यांना कळविण्यात आलेले आहे.

तसेच सदर लेखी निवेदनानुसार हिल टॉप हिल स्लोप समार जागेवर अनाधिकृत उत्खनन आढळून आलेल्या ठिकाणी यापूर्वी देखील कारवाई करण्यात आली असून यापुढेही अशी बाब आढळल्यास कारवाई करण्याच्या सूचना संबंधित ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांना तहसिलदार हवेली यांनी देण्यात आल्या आहेत.

(५) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अन्वये दुय्यम निबंधक यांचेकडील नोंदणीकृत प्राप्त दस्तांनुसार अधिकार अभिलेखात हक्कनोंद करणेबाबत प्रचलित नियम व कायदयानुसार महसूल विभागाकडून कार्यवाही करणेत येते.

कोंढवा, येवलेवाडी भागातील अनाधिकृत प्लॉटिंग / प्लॉटिंगमधील कॉक्रींट रस्ते / तार कंपाऊंड / अनाधिकृत पत्राशेड / गोडाऊन / सिमाभिंत महानगरपालिकेने वेळोवेळी कारवाई केलेली आहे.

सामान्य नागरिकांनी पुणे महानगरपालिका हद्दीतील आरक्षित जागेवर तसेच हिल टॉप हिल स्लोप जागेवर अनाधिकृत प्लॉटींग / बांधकाम खरेदी करु नये, याबाबत पुणे महानगरपालिकेकडून वेळोवेळी जनजागृती करण्यात येत आहे.

(६) विलंब होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील केईएम रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) * १६४० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केईएम रुग्णालय, मुंबई येथील १६० पदे रिक्त असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील पदे रिक्त असल्याने कामाचा आणि रुग्णांचा अतिरिक्त भार अस्तित्वात असणाऱ्या मनुष्यबळावर पडत असल्याने रुग्णांना वैद्यकीय सेवा देण्यात अनेक समस्या उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आढावा घेऊन सदर रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या राजे एडवर्ड स्मारक (केईएम) रुग्णालय व सेठ गोर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय च्या आस्थापनेवर एकूण ५३४१ मंजूर पदे असून त्यापैकी २०९१ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत. तथापि, रुग्णांना वैद्यकीय सेवा देण्यास अडचण येवू नये याकरीता रिक्त पदांपैकी १२६२ इतकी पदे कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत.

(३) नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होणार नाही याकरीता रिक्त पदे कायमस्वरूपी तत्वावर तातडीने भरण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## समृद्धी महामार्गावर प्रवाशांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(१८) * १८२७ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर उत्तम उपहारगृहे, प्रसाधनगृहे, वाहन दुरुस्ती केंद्रे इत्यादी मूलभूत सुविधांचा अभाव असल्याची बाब दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गावर अस्तित्वात असलेल्या पेट्रोल पंप व उपहारगृहात अनेक प्रकारच्या समस्या उद्‌भवत असून स्वच्छतेचा अभाव दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई ते नागपूरला जोडणाऱ्या समृध्दी महामार्गावरील वाशिम जिल्ह्यातील वनोजा नजिकच्या इंटरचेंज महामार्गावर जाणाऱ्या सुमारे ५० ते ६० वाहनांची चाके पंक्चर होऊन वाहनचालक व प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागल्याची घटना दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास घडली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,समृध्दी महामार्गावर पंक्चर काढण्याची कोणतीच सोय नसून सदर महामार्गावर प्रवाशांसाठी तातडीने कायमस्वरुपी मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

दिनांक २९/१२/२०२४ रोजी रात्रीच्या सुमारास वाशिम जिल्ह्यामधील समृध्दी महामार्गावरुन जाणाऱ्या ट्रेलरमधून वजनदार लोखंडी पत्रा पडला होता.त्यावरुन वेगाने काही वाहने गेल्यामुळे त्यांची चाके पंक्चर झाली.

(४) समृध्दी महामार्गावर सद्य:स्थितीत २१ ठिकाणी इंधन स्थानके कार्यरत आहे. येथे इंधन, हवा भरणेची सोय, स्वच्छतागृहे, पाणी, खाद्यपदार्थ व काही ठिकाणी पंक्चर काढणे इ. सुविधा उपलब्ध आहे. समृध्दी महामार्गावर १६ ठिकाणी परिपूर्ण मार्ग सुविधा (Wayside Amenities) उभारणेसाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर सुविधा कार्यान्वयीत करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील कस्तुरचंद मैदानाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१९) * १९८३ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील ऐतिहासिक ठेवा असलेल्या कस्तुरचंद मैदानाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून, मैदानाची सद्य:स्थिती, संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) आणि सर्वसमावेशक विकास आराखडा तीन आठवड्यात सादर करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हाधिकारी, नागपूर यांना दिनांक १६ ऑक्टोबर, २०२४ रोजी देण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) व सर्वसमावेशक विकास आराखडा त्वरीत पाठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, नागपूर शहरात खेळाडूंना सराव करण्यासाठी अत्यंत अल्प मैदाने उपलब्ध असून, सदर मैदानांवर खेळाव्यतिरिक्त वर्षभर जत्रा, प्रदर्शन, मेळावे, सर्कशीचे खेळ, राजकीय किंवा धार्मिक कार्यक्रम होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे युवा खेळाडूंना सराव करण्यात अनेक समस्या उद्‌भवत असून, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील खेळाडूंना पूर्णवेळ सरावासाठी मैदान उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सदर मैदानाचा व्यावसायिक उपयोग होऊ नये तसेच अतिक्रमण व अनधिकृत वापरापासून संरक्षण व सौदर्यीकरण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय. खरे आहे.

(२) सदर मैदानातील ऐतिहासिक वास्तूचे संरचनात्मक लेखापरिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, नागपूर यांनी दुरुस्तीच्या कामास व सौंदर्यीकरणाच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असून, सदरहु काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे.

(३) होय, अंशत: खरे आहे.

(४) खरे नाही.

(५) हेरिटेज संवर्धन समिती, नागपूर यांच्याकडून कस्तुरचंद पार्क मैदान येथे होणाऱ्या कार्यक्रमाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालया मार्फत अंतिम परवानगी आदेश अटी व शर्तीच्या अधिन राहुन देण्यात येते. त्यामुळे कस्तुरचंद पार्क मैदानाचा व्यावसायिक उपयोग होत नाही. महानगरपालिका,नागपूर यांच्याकडून संरक्षक भिंत, दरवाजे, प्रसाधन गृह बांधण्यात आले आहे. तसेच अनधिकृत वापरापासून संरक्षण करण्याकरीता सुरक्षा रक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे.

(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण परिसरातील नियोजित जल पर्यटन केंद्र रद्द करणेबाबत

**(२०)** * **१९९७ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरण परिसरात (ता.माढा,जि.सोलापूर) होणारे नियोजित जल पर्यटन केंद्र रद्द करण्याची मागणी सातत्याने तेथील शेतकऱ्यांकडून होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या पूर्ततेसाठी तेथील धरणग्रस्त महिला व परिसरातील शेतकऱ्यांनी आक्रमक होऊन उजनी जलाशयात उड्या मारून जलसमाधी आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संपादित केलेल्या विनावापर जमिनी मूळ मालकांना परत करण्याची मुख्य मागणी धरणग्रस्त शेतकरी आंदोलकानी केली असून सदर प्रकल्पाच्या भूसंपादनामुळे धरणग्रस्तांना आजतागायत जमिनीचा मोबदलाही मिळाला नसून शेतकरी कुटुंबांवर अन्याय करुन सदरहू योजना राबविली जात असल्याने तेथील स्थानिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संपादित क्षेत्रामध्ये राहती घरे, धार्मिक मंदिरे, उभी पिके, फळबागा इत्यादी असल्याने सदरची जमीन जल पर्यटनासाठी न वापरता ती मूळ मालकास परत द्यावी तसेच पुर नियंत्रण रेषेबाहेरील जमिनी परत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे. माढा तालुका उजनी धरणग्रस्त संघटना यांनी दिनांक ०३/०२/२०२५ रोजी नियोजित जलपर्यटन स्थळ रद्द होणेबाबत निवेदन दिले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

जमिनी परत करण्याची मागणी केली आहे. सदर संपादित जमिनीचा मोबदला भूसंपादन अधिकारी यांचेद्वारे मूळ मालकांना अदा करण्यात आलेला आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशय, जलपर्यटन,

धार्मिक, निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटन, विनयार्ड पर्यटन विकासाच्या एकात्मिक पर्यटन विकास आराखड्यास नियोजन विभागाच्या दिनांक ३०/०९/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर उजनी जलपर्यटन विकास कामांसाठी अद्याप कोणतीही जागा निश्चिती करण्यात आलेली नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे काम जागेवर सुरू केलेले नाही.

(४) शासकीय प्रकल्पासाठी संपादित जमिनी मूळ मालकास परत करणेबाबत कोणतेही शासकीय धोरण नसल्याने जमीन परत करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

त्याचबरोबर महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे नियामक मंडळाच्या दिनांक २० जून, २०१६ चे ठरावानुसार (ठराव क्र. ९२/१९) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या जनहित याचिकेचा अंतिम निर्णय होईपर्यंत महामंडळाच्या अतिरिक्त जमीनी - क्षेत्र मागणीबाबतचे खाजगी व्यक्ती/संस्था यांचे प्रस्ताव - निवेदने सादर न करणेबाबत निर्देश आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर शहरास अतिरिक्त पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनी व जलशुध्दीकरण केंद्र उभारणीचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२१)** * **५२५ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहराला अतिरिक्त ७५ एमएलडी पाणीपुरवठा करण्यासाठी जायकवाडी ते नक्षत्रवाडीपर्यंत ९०० मिमी व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आली असून, त्यासाठी रुपये २०० कोटी खर्च करण्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फारोळा (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथे २६ एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारणीचे काम दोन वर्षांपूर्वी सुरू झाले असूनही सद्य:स्थितीत हे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने उन्हाळ्यात या योजनेचे पाणी उपलब्ध होणार नसल्याने शहरात पाणीटंचाईची समस्या निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर शहर व परिसरातील पाणीटंचाईची कायमस्वरुपी समस्या निकाली काढण्याच्या दृष्टीने तसेच जलवाहिनी व जलशुद्धीकरण केंद्राच्या उभारणीचे काम तातडीने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरहू काम अत्यंत विलंबाने होत असून त्यामुळे परिसरातील जनतेला पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने प्रचंड त्रास होत आहे व कामाच्या रकमेत वाढ होत असल्याने सदरहू काम पूर्ण करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित ठेकेदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानंतर्गत छत्रपती संभाजीनगर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकल्पातील अस्तित्वातील ५६ द.ल.लि. जलशुद्धीकरण केंद्र, जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंतच्या ९०० मीमी व्यासाची डी आय के-९ जलवाहिनीचे काम व इतर आनुषंगिक रुपये १९३.७२ कोटी

कामांचा प्रस्तुत प्रकल्पात समावेश आहे. प्रकल्पातील सदरील कामे कमी कालावधीमध्ये पूर्ण होण्यासाठी प्रस्तुत कामाच्या निविदा ५ टप्प्यात काढण्यात आल्या. सदर कामावर आजमितीस एकूण रुपये १५९ कोटी खर्च झालेला आहे.

सदरील कामातील जायकवाडी उद्धव विहीर ते नक्षत्रवाडी संतुलन जलकुंभापर्यंत एकूण ३९८९२ मी लांबीच्या जलवाहिनीचे काम साधारणतः फेब्रुवारी, २०२४ अखेर युध्दपातळीवर पूर्ण करून व जलदाब चाचणी घेऊन ५६ द.ल.लि. योजनेच्या जायकवाडी येथील उद्धव विहिरीवर एक तसेच फारोळा येथील १०० दललि जलशुद्धीकरण केंद्राच्या पंप गृहात एक व नक्षत्रवाडी येथील पंप गृहात दोन असे ४२६ अश्वशक्तीचे पंप बसवून तसेच, ५६ द.ल.लि. व १०० दललि अस्तित्वातील जलशुद्धीकरण केंद्र त्यांच्या वाढीव क्षमतेस चालवून ३१ मार्च, २०२४ पासून ९०० मीमी व्यासाची डी आय के-९ जलवाहिनी यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आली. सदर जलवाहिनी कार्यान्वित करून ३१ मार्च, २०२४ पासून ते आजतागायत अवितरतपणे साधारणतः २४ द.ल.लि. इतका वाढीव पाणीपुरवठा छत्रपती संभाजीनगर शहरास करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकल्पाच्या ५ टप्प्यापैकी २६ दललि क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, ३.५ द.ल.लि.संतुलन जलकुंभ, अस्तित्वातील ५६ दललि जलशुद्धीकरण केंद्र, नक्षत्रवाडी व ढोरकीन येथील पंप गृह यांची दुरुस्ती असलेल्या टप्पा क्रमांक ४ च्या कामातील फारोळा येथील २६ द.ल.लि. क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्राचे काम प्रगतीपथावर असून जलशुद्धीकरण केंद्राचे काम जून, २०२५ अखेर कार्यान्वित करण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत टप्पा क्रमांक ४ च्या कामाची ७० % भौतिक प्रगती झालेली आहे.

प्रस्तुत काम विहित कालावधीत पूर्ण न केल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत कंत्राटदारास दिनांक ०१ डिसेंबर, २०२४ पासून प्रति दिन रुपये १९,१५० रुपये दंड लावण्यात आलेला आहे.

सदरील २६ दललि क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित झाल्यानंतर व अस्तित्वातील ५६ द.ल.लि. जलशुद्धीकरण केंद्राद्वारे एकूण ७५ द.ल.लि. पाणीपुरवठा छत्रपती संभाजीनगर शहरास करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला हस्तांतरित करावयाच्या सदनिकांची विकासकाने परस्पर विक्री केल्याबाबत

**(२२) * ३०५ श्री.शशिकांत शिंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.अरुण लाड, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला हस्तांतरित करावयाच्या काही सदनिकांची विकासकाने परस्पर विक्री केली असून या प्रकरणाची धारिका / नस्ती, सर्व्हेअर, नगर रचना विभाग, यांनी गहाळ केली असल्याची बाब निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्व्हेअर, नगररचना विभाग यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी एका सामाजिक कार्यकर्त्याने आयुक्त, कल्याण – डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे माहे डिसेंबर, २०२४ च्या अंतिम सप्ताहात वा दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सर्व्हेअर, नगररचना विभाग यांना विनाविलंब निलंबित करुन विभागीय चौकशी करण्याबाबत आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना दिनांक २८ डिसेंबर, २०२३ रोजी व त्यानंतर सहा वेळा स्मरणपत्र देऊनही कोणतीही चौकशी वा कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व्हेअर, नगररचना विभाग यांनी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी यात सहभागी असलेल्या संबंधित दोषी विकासक आणि अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदरहु बांधकाम परवानगी ही दिनांक १२/०३/२०१५ रोजी प्रदान करण्यात आलेली असून, यामध्ये महानगरपालिकेस एक सदनिका हस्तांतरीत करणे अभिप्रेत आहे.

सदर प्रकरणी प्रभाग क्षेत्र अधिकारी ‘क’ प्रभाग यांचे पत्रानुसार या प्रकरणी नस्ती सर्वेक्षणाकरीता अभिलेख कक्षामधून सर्व्हेअर यांचेकडे देण्यात आलेबाबतची नोंद आहे.
तद्नंतर सन २०१८ च्या सुमारास सदरहु नस्ती अभिलेख कक्षामध्ये आढळून आलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.मात्र महानगरपालिकेच्या कर विभागाकडील उपलब्ध बांधकाम नकाशे, तत्सम कागदपत्रांच्या आधारे दुय्यम नस्ती तयार करण्यात आलेली आहे.
(२) अशा आशयाची तक्रार महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरावर चौकशी सुरू आहे. तसेच, सद्य:स्थितीत संबंधित सर्व्हेअर यांची नगररचना विभागातून बदली करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील नागरिकांची मे.फ्यूचर गेमिंग लॉटरी ॲण्ड हॉटेल सर्विस प्रा.लि. कंपनीकडून फसवणूक होत असल्याबाबत

**(२३)** * **९९४ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात फ्यूचर गेमिंग लॉटरी ॲण्ड हॉटेल सर्विस प्रा.लि. कंपनी व लॉटरी माफिया या सेंटिगो मार्टिन यांच्या उपकंपन्या असून त्यांनी महाराष्ट्रात इतर राज्यांच्या लॉटरी चालविण्याचे कंत्राट घेऊन शासन व सामान्य नागरिकांची लूट करीत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मे.फ्युचर गेमिंग ॲण्ड हॉटेल सर्व्हिस प्रा.लि. नावाने डियर लॉटरी ही पंजाब शासनाची कंपनी राज्यात लॉटरी विक्री करीत असून ती केंद्र शासनाच्या लॉटरी अधिनियम २०१० मधील नियमांचे पूर्णपणे उल्लंघन करुन राज्य शासनाचा कोटयवधी रूपयांचा कर बुडविल्यामुळे लॉटरी संचालनालयाने संबंधितांना नोटीसा देखील बजाविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंजाब शासनाकडून लॉटरीचे हक्क विकत घेऊन राज्यात डियर ही पेपर लॉटरी सेंटिगो मार्टिन चालवित असून, दररोज शेकडो कोटी रूपयांचा गैरव्यवहार या कंपनीकडून होत असल्याचे

निदर्शनास आले असून या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) व (२) नाही, हे खरे नाही
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: गडचिरोली जिल्ह्यात मोह फुलांपासून इथेनॉल निर्मितीची चाचणी करण्याबाबत

**(२४) * १३३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गडचिरोलीसह अनेक जिल्ह्यांचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वनांनी व्यापलेले असून उक्त जिल्ह्यांतील आदिवासी उदरनिर्वाहासाठी मोह फुले वेचण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यात दारू विक्री व निर्मितीस बंदी असल्यामुळे मोह फुलांपासून इथेनॉल निर्मितीची चाचणी करण्याचे आश्वासन गृह मंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोह फुलांचा वापर हा औषधांसाठी, दारु बनविण्यासाठी तसेच अनेक औद्योगिक वापरासाठी होत असल्यामुळे अनेकांना त्यामुळे रोजगार उपलब्ध होत असून वनक्षेत्रात मोह फुलांपासून इथेनॉल निर्मितीची चाचणी करण्यासह आदिवासींना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

शासन आदेश दिनांक १४/०९/१९९२ अन्वये गडचिरोली जिल्ह्यात किरकोळ व ठोक मद्यविक्रीस प्रतिबंध करण्यात आलेला आहे. तथापि, सदर आदेशानुसार जिल्ह्यात मद्य/मद्यार्क निर्मिती प्रकल्प उभारण्यास बंधन नाही. तत्कालिन मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांनी माहे डिसेंबर, २०२३ च्या अधिवेशनामध्ये गडचिरोली जिल्ह्यात मोहफुलापासून इथेनॉल निर्मिती चाचणी करण्याबाबत आश्वासन दिले होते.
(३) मोहफुलापासून मद्य/मद्यार्क निर्मितीकरीता अनुज्ञप्ती मंजूरीबाबत राज्यात गडचिरोली, गोंदिया व नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी एक अशा तीन घटकांना इरादापत्र मंजूर करण्यात आले आहे. तसेच, मोहफुलापासून इथेनॉल निर्मिती आणि उप-पदार्थ निर्मितीची शक्यता तपासण्यासाठी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांच्या अध्यक्षतेखाली माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये समिती गठित करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोअर परळ (मुंबई) येथील फिनिक्स मिल्स कंपाउंडमधील हॉटेल इमारतीत अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२५)** * **१८७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ (मुंबई) येथील सेनापती बापट मार्गावरील फिनिक्स मिल्स कंपाउंड मधील सी.एस. क्र. १४१, ७१, १०९ आणि १/१४२ येथे उभारण्यात आलेल्या एका हॉटेल इमारतीच्या मान्यता प्राप्त आराखड्यात हॉटेल मालकाने अनेक प्रकारचे अनधिकृत बदल केले असल्याची बाब दिनांक ९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित मालकाने प्राप्त एफ.एस.आय.चे उल्लंघन करून हॉटेलमधील अनेक गाळयांत अनधिकृत संरचनात्मक बदल केले असून सदरहू इमारतीत लोकांच्या मार्गक्रमणासाठी अत्यावश्यक आणि बंधनकारक असलेल्या मोकळया जागांवर अतिक्रमण करून १५ पेक्षा जास्त उपहारगृहे सुरू केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या अनधिकृत बांधकामांची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीच्या अनुषंगाने फिनिक्स मिल्स कंपाउंडमधील हॉटेल इमारतीत अनधिकृत बांधकाम करणाऱ्या हॉटेल व्यवस्थापनावर आणि त्याला पाठीशी घालणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशी बाब नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवालानुसार सदर भुखंडावरील हॉटेल इमारतीस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागाने दिनांक १६/०५/२०२४ रोजी भोगवटा प्रमाणपत्र मंजूरी दिली असून, महापालिकेने सदर इमारतीची तपासणी केली असता मंजूर आराखड्यामध्ये बदल केल्याचे आढळून आलेले नाही.

(२) अशी बाब नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवालानुसार महापालिकेचे अधिकाऱ्यांनी सदरहू हॉटेल इमारतीची पाहणी केली असता, सद्य:स्थितीत कोणतेही अनधिकृत बांधकाम आढळून आलेले नाही. तसेच मंजूर आराखड्यानुसार या इमारतीमध्ये लोकांच्या मार्गक्रमणासाठी अत्यावश्यक आणि बंधनकारक असलेल्या मोकळया जागांवर अतिक्रमण आढळून आलेले नाही.

महापालिकेने सदर हॉटेल इमारतीमध्ये एकूण १२ आस्थापनांना परवानगी दिली असून त्यामध्ये ९ उपहारगृह, १ लॉजिंग हाऊस, १ सलून व १ लॉंड्रीकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३९४ अन्वये परवाने देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उध्दवत नाही.

(४) लागू नाही.

-----------------

## मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या निविदेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२६) * १४६० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये उद्याने व मैदाने देखभाल व निगा यांची निविदा मंजुरी/ देयके अदा करण्याच्या कामांमध्ये अनियमितता व नियमाचे उल्लघंन झाल्याने सदर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले असून आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करणेची मागणी माजी नगरसेवक, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य, लोकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे वारंवार शासनाकडे केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नियमांचे उल्लंघन करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणाऱ्या संबंधितांवर लोकप्रतिनिधीनी केलेल्या मागणीच्या आधारे शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाचे निवेदन माजी नगरसेवक यांचेकडून प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(२) मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके यांची निगा व देखभाल करणेसाठी कामनिहाय निविदा मागविण्यात आल्या होत्या. तद्नंतर मिरा-भाईंदर महानगरपालिका महासभेने पारीत केलेल्या ठरावाप्रमाणेच निगा व देखभाल कामाचे अंदाजपत्रक करून ऑनलाईन ई-निविदा मागवून, प्राप्त निविदेतील L१ दरास देणेबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस सादर करण्यात आला होता.तथापि, त्यास स्थायी समितीने मान्यता दिलेली नाही.

त्यानुसार स्थायी समितीने पारीत केलेला ठराव महानगरपालिकेच्या हिताच्या विरोधात असल्याचे नमूद करून, सदर ठराव विखंडीत करण्याबाबतचा आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचा प्रस्ताव प्राप्त झाला असता, तो दिनांक ०२/०३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंतिमत:विखंडीत करून, मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस L१ दराची निविदा मंजूर करून निविदेतील अटीशर्तीनुसार कार्यादेश देण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये उद्याने व मैदाने देखभाल व निगा यांची निविदा मंजुरी/ देयके अदा करण्याच्या कामांमध्ये अनियमितता व नियमाचे उल्लघंन झाले असल्याबाबतचे तक्रार अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झाले. तसेच, यासंदर्भात तक्रारदार यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका देखील दाखल केली होती.

प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यावर सदरची याचिका निरर्थक असल्याचे नमूद करून दिनांक ३०/०३/२०२१ रोजी मा.उच्च न्यायालयाने याचिका निकाली काढली.

मे. निसर्ग लॅण्डस्केप सर्व्हिसेस यांना त्यांच्या कामानुसार देयके अदा करण्यात आलेली आहेत. सदर निविदेचा कालावधी दिनांक १३/०३/२०२४ रोजी संपुष्टात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहर विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(२७) * ५८३ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विकसित सोलापूर शहर ही संकल्पना घेऊन पुढील २० वर्षासाठीचा सोलापूर शहर विकास आराखडा तयार करण्यात येत असून या आराखड्यात हद्दवाढ भागातील विकासाचे व्हिजन तसेच विविध भागांमध्ये क्रीडांगणे, उद्याने, विरंगुळा केंद्र, वाहनतळ, नागरिकांना अपेक्षित इतर सर्व बाबींचा समावेश करण्यात येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने नव्या सुधारित विकास योजनेचा प्रारुप आराखडा (डीपी) तयार करताना सातारा शहराची नक्कल (कॉपी) केली असून यात अजिंक्यतारा किल्ला (फोर्ट), जलमंदिर राजवाडा, चार भिंती, बदामी विहीर आदीं गोष्टींचा समावेश असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुळे सोलापूर हद्दवाढ परिसरात सार्वजनिक उद्याने, बस स्थानक, नाट्यगृह, क्रीडांगणे, हॉस्पिटल, शाळा, वाहनतळ अशा अनेक सुविधांची गरज असतानाही याचा समावेश या आराखड्यात करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आराखडा रद्द करण्याची मागणी स्थानिक जनतेतून व लोकप्रतिनिधींकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन सोलापूर शहर विकास आराखड्यास मान्यता देण्यापूर्वी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचित केलेल्या प्रस्तावांचा समावेश सदर नवीन आराखड्यात करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे की, सोलापूर शहराची प्रारूप विकास योजना (३ री सुधारीत / म.न.पा. हद्दवाढीसह, एकत्रित) म.प्रा.नि.व.न.र. अधिनियम, १९६६ चे कलम २६ अन्वये नागरिकांचे सूचना व हरकती मागविणेसाठी महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर प्रसिध्द प्रारुप विकास योजनेमध्ये क्रीडांगणे, उद्याने/ विरंगुळा केंद्र, वाहनतळ, रस्ते इ. नागरिकांना अपेक्षित इतर सर्व बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

(२) होय, हे खरे आहे. सोलापूर शहराच्या प्रारुप विकास योजनेचा अहवाल तयार करत असताना उक्त विकास योजना प्रसिध्द करण्याची कालमर्यादा विचारात घेता ती विहित कालमर्यादेमध्ये प्रसिध्द करणे आवश्यक होते. त्यासाठी नमुना म्हणून (format) नुकताच प्रसिध्द झालेल्या सातारा शहराच्या प्रारुप विकास योजनेच्या अहवालाची प्रत घेण्यात आली होती. त्यामुळे त्यातील अजिंक्यतारा किल्ला, जलमंदिर राजवाडा, चार भिंती, बदामी विहीर आदीं गोष्टींचा समावेश चुकीने झालेला आहे. याबाबत टंकलिखीत चुक दुरुस्त करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही. सोलापूर शहराच्या प्रारुप विकास योजना मधील जुळे सोलापूर हद्दवाढ परिसर हा सेक्टर १३A व सेक्टर १५ मध्ये येत असून त्यामध्ये सन २०३४ ची प्रक्षेपित लोकसंख्या गृहीत धरुन सदर लोकसंख्येसाठी आवश्यक ती आरक्षणे प्रस्तावित करणेत आलेली आहेत.

(४) होय. हे खरे आहे सदर विकास आराखडा रद्द करण्याची मागणी स्थानिक जनतेकडून व लोकप्रतिनिधी कडून करण्यात येत आहे. परंतु सदर विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना १९६६ अधिनियमाच्या सर्व तरतुदीचे पालन करुन व वैधानिक कार्यवाही करून तयार करण्यात येत आहे.

(५) प्रारुप विकास योजनेच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधी यांना त्यांचे काही प्रस्ताव सूचित करावयाचे असतील त्यांनी त्यांचे प्रस्ताव कलम २८(२) अन्वये गठीत झालेल्या नियोजन समितीकडे सादर करण्याची व सुनावणीची संधी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना आहे.

तद्नंतर उक्त कलम २८(२) अन्वये गठीत नियोजन समिती त्यांच्या अभिप्रायांसह अहवाल ज्यावेळी नियोजन प्राधिकरणास सादर करेल. त्यावर अंतिम निर्णय नियोजन प्राधिकरणाचे स्तरावर होऊन सदर प्रारुप विकास योजना ज्यावेळी शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात येईल. त्यावेळी लोकप्रतिनिधींच्या प्रस्तावांचा संचालनालयाचे स्तरावर देखील विचार करण्यात येईल.

तसेच शासनाच्या स्तरावर देखील लोकप्रतिनिधींनी सुचित केलेल्या प्रस्तावांचा समावेश सदर प्रारूप विकास योजनेस कलम ३१(१) अन्वये अंतिम मंजूरी देतेवेळी नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

(६) विलंब झालेला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बावनथडी प्रकल्पाच्या वितरिका अस्तरीकरणाविना असल्याबाबत

**(२८) * १६७६ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावनथडी प्रकल्प (ता.तुमसर, जि.भंडारा) पूर्ण होण्याकरीता ३५ वर्षे लागली तरी या प्रकल्पाच्या वितरिका अजूनही अस्तरीकरणाविना असल्याचे माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याच्या अति जलद प्रवाहामुळे अस्तरीकरण न केलेल्या वितरिका फुटून पाणी वाया गेल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून सदरहू प्रकल्पातील वितरिकांचे अस्तरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूरच्या कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग गोंदिया यांनी बावनथडी प्रकल्पाच्या ई-निविदा सूचना क्र८/२०२४-२५ प्रसिध्द केली असून या निविदेत शासन निर्णय दिनांक २८/०२/२०२४ मधील ३३:३३;३४ नियमानुसार निविदा वर्गवारी करण्यात आलेली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या निविदेत फक्त नोंदणीकृत कंत्राटदारांकडूनच निविदा मागविण्यात आल्याने इतर कंत्राटदार आणि मजुर संस्थांचे मोठे नुकसान होत असून सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करून पुन्हा नव्याने नियमानुसार निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

बावनथडी हा आंतराज्यीय मोठा प्रकल्प असून त्यास दिनांक १२/०९/१९७५ ला मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच प्रकल्पाची मूळ कामे सन २०१९ ला पूर्ण झाली असून संपूर्ण सिंचन क्षमता २७७०८ हे. निर्माण होऊन प्रकल्प पूर्णत्व अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या वितरण प्रणालीवर निवडक ठिकाणी अस्तरीकरण करण्यात आलेले आहे. तसेच प्रकल्पांवर २०१५ पासून नियमित सिंचन करण्यात येत असून सिंचन करतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता आवश्यकतेनुसार निवडक ठिकाणी अस्तरीकरण प्रकल्पाच्या पंचम सुप्रमात अंतर्भूत करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सिंचन करतांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता आवश्यकतेनुसार निवडक ठिकाणी अस्तरीकरण प्रकल्पाच्या पंचम सुप्रमात अंतर्भूत करण्यात आले आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजुर सहकारी संस्था व खुली निविदा यांचे ३३:३३:३४ चे प्रमाण विभागीय स्तरावरील प्रत्येक निविदा सूचनेत राखणे व्यावहारिक दृष्ट्या शक्य नाही. तथापि, प्रत्येक आर्थिक वर्षांमध्ये सदर प्रमाण विभागीय स्तरावर राखण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

या निविदा सूचनेविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल करण्यात आली होती. ती खारीज करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## ठाणे शहरात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(२९) * ६७० ॲड.अनिल परब, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात महानगरपालिकेने सुरक्षेच्या दृष्टीकोनातून बसविण्यात आलेल्या १४०० पैकी ११२ सीसीटीव्ही कॅमेरे काही महिन्यांपासून नादुरुस्त असून नवीन कॅमेरे बसविण्यासाठी महानगरपालिकेकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेकडून बंद कॅमेऱ्यांच्या जागेवर नवीन कॅमेरे बसविण्यासाठी पोलीस योजनेतील निधी वापरण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कॅमेऱ्यांमुळे शहरातील अनेक गुन्हे उघडकीस होण्यासाठी पोलिसांना मदत होणार असून नागरिकांच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेले हे सीसीटीव्ही कॅमेरे तांत्रिक अडचणी, झाडांच्या फांद्या पडणे, वारा, पाऊस यामुळे बंद होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने ठाणे शहरात सुरक्षेच्या दृष्टीने नवीन कॅमेरे बसविण्याकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेमार्फत शहरात बसविण्यात आलेल्या १७६० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी ११२ सीसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्त झाले आहेत.

ठाणे शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी नवीन आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करणेबाबत ठाणे महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(२) खरे नाही.

(३) खरे आहे.

(४) ठाणे शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी नवीन आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात निधी उपलब्ध करणेबाबत ठाणे महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तथापि,पोलीस विभागाकडून संपूर्ण ठाणे शहरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येत असल्याने महानगरपालिकेस सदर निधीची आवश्यकता कमी होण्याची शक्यता आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील बिलोली व देगलूर दरम्यानच्या पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(३०)** * **११०२ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील मन्याड नदीच्या दोन्ही बाजुला बिलोली तालुक्यातील गळेगाव व देगलूर तालुक्यातील वझरगा, तुपशेळगाव, आलूर, शहापूर, लिंबा या गावांतील शेतकऱ्यांची सुमारे ५०० एकर शेतजमीन असून तेथील शेतकऱ्यांना रस्ता नसल्याने नदीपात्रातून जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत असल्यामुळे शासनाने तात्काळ पूल बांधून दयावा अशी मागणी त्या भागातील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मन्याड नदीच्या एका बाजूला गाव अन एका बाजूला शेत असल्याने शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्यामुळे तसेच जवळपास बारमाही वाहणाऱ्या मन्याड नदीला पावसाळयात कायम पूरसदृश स्थिती असल्यामुळे शेकडो हेक्टर जमीन पेरणीअभावी पडीक राहत असल्याने शेतकऱ्यांनी अनेक वेळा शासनाकडे पुलासाठी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने ग्रामस्थांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन मन्याड नदीवर बिलोली व देगलूर दरम्यान पूल बांधण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर ठिकाणी नवीन पूल बांधणेबाबत वृत्तपत्रात बातमी आहे.

(२) व (३) पूलाचे बांधकाम निकष, प्रकरणाची सुसाध्यता व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेत नोकरी मिळविण्यासाठी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून नोकरी मिळविल्याबाबत

**(३१) * ११५२ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत नोकरी मिळविण्यासाठी सात जणांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून नोकरी मिळविल्याची तक्रार सदर महानगरपालिकेस प्राप्त झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिव्यांग कल्याण आयुक्तांनी महानगरपालिकेला पत्र देऊन त्यावर कार्यवाही करावी असे पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी आढळून आलेल्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) बोगस दिव्यांग प्रमाणपत्रकाढून स्थापत्य अभियंता पदावर नोकरी मिळविलेल्यांवर कार्यवाही करणेबाबतचे तक्रार पत्र दिव्यांग कल्याण आयुक्तालय व इतर संस्था यांचेकडून प्राप्त झाले आहे.

त्यानुषंगाने आयुक्त यांचे आदेशानुसार शासन निर्णय क्र.अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२४ अन्वये दिव्यांग प्रमाणपत्राबाबत अध्यक्ष तथा अधीक्षक, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे यांच्याकडे दिव्यांग प्रमाणपत्र तपासून मिळणे व त्यांच्या टक्केवारीबाबत तपशीलवार माहिती मिळणेकरीता अपील करण्यात आले आहे.

एकूण ८ सेवकांपैकी ५ सेवकांचे दिव्यांग प्रमाणपत्र योग्य (Valid) असल्याबाबत समितीचे पत्र प्राप्त झाले आहे. उर्वरित ३ सेवकांचे अहवाल प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सागरी किनारा मार्गावर नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(३२) * ५२२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सागरी किनारा मार्ग हा वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा असून, त्या मार्गावर नियमांचे वारंवार उल्लंघन होत असल्यामुळे स्थानिक नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे तसेच सागरी किनारा मार्गावर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी दुचाकी व पादचाऱ्यांना जाण्यास बंदी असूनही, वांद्रे येथे काही विक्रेते विनापरवाना व्यवसाय करित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रात्रीच्या वेळी स्पोर्ट्स कार व कस्टमाइज्ड मोटारींच्या मोठ्या आवाजामुळे परिसरात ध्वनी प्रदूषण होत असून यामुळे स्थानिक रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सामाजिक संस्था व स्थानिक नागरिकांनी संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचेकडे तक्रार करुनही त्यांचे विनापरवाना व्यवसाय करणाऱ्यांसोबत आर्थिक हितसंबंध असल्यामुळे त्यांचेकडून कारवाई करण्यास दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सागरी किनारा मार्गावरील नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

वांद्रे येथील राजीव गांधी सागरी सेतू हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या अखत्यारित असून येथे विक्रेते विनापरवाना व्यवसाय करित असल्याचे आढळून आले नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) ध्वनी प्रदुषणाबाबत स्थानिक रहिवाशांकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सागरी किनारी मार्गावर राज्य महामार्ग पोलीस दलाच्या मदतीने दररोज सकाळी ७ वा. ते रात्री ११ वा. पर्यंत भरधाव वेगाने वाहने चालविणाऱ्या चालकांवर स्पिडगन मशिन कॅमेऱ्याच्या सहाय्याने नियमित कारवाया करण्यात येत आहेत. सदर ठिकाणी वरळी वाहतूक विभाग आणि ताडदेव वाहतूक विभागाकडून अंमलदार नेमून अद्यापपर्यंत २९६४ इतक्या कारवाया करण्यात आल्या आहेत. वांद्रे वाहतूक विभागाकडून बांद्रा पोलीस ठाणेचे मदतीने रिक्लेमेशन परिसरात विशेष नाकाबंदीचे आयोजन करुन रेसिंग व कर्णकर्कश स्पोर्ट्स कार व कस्टमाइज्ड मोटारींवर कारवाई करण्यात येते.

सद्य:स्थितीत सह आयुक्त (वाहतूक) यांच्यामार्फत वाहनांच्या वेगावर निगराणी करण्याकरीता गती उल्लंघन शोधणारी यंत्रणा असलेली वाहने किनारी रस्त्यावर उचित ठिकाणी तैनात केलेली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या गाड्यांवर त्यांच्या मार्फत कारवाई करण्यात येत आहे.

किनारी रस्ता प्रकल्पामध्ये वाहतूक नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी कॅमेरे (ANPR : Automatic Number Plate Recognition Camera) बसविण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे. सदर कॅमेरे मे, २०२५ पर्यंत कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण –डोंबिवली महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या ट्रकच्या धडकेत आई व मुलाचा जागीच मृत्यू झाल्याबाबत

**(३३)** * **१११३ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-आग्रा रोडवरील लालचौकी परिसर, कल्याण (प) येथे रस्ता ओलांडताना आई व मुलाचा कल्याण –डोंबिवली महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाच्या भरधाव ट्रकने धडक दिल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडल्याची बाब माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर अपघाताची शासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित प्रकरणी दोषी आढळून आलेल्यांविरूध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे, तसेच मृत पावलेल्यांच्या कुटुंबियाना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील लालचौकी, कल्याण (प.) परिसरात सहजानंद चौकाकडून दुर्गाडी चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर डंपर ट्रकने आई व मुलाला धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे.

मात्र सदरचे वाहन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मालकीचे नसून, महानगरपालिकेच्या ठेकेदाराच्या वापरातील आहे. सदर अपघाताच्या वेळेत सदरचे वाहन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरीता वापरात नव्हते, ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर अपघातानंतर बाजारपेठ पोलीस स्टेशन, कल्याण येथे चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी अपघातात मृत पावलेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याचे महानगरपालिकेचे कुठलेही धोरण नाही. त्यामुळे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांदिवली (पू.) (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या मैदानांचा व्यावसायिक वापर करण्यात येत असल्याबाबत

**(३४)** * **७९७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची मुंबईतील अनेक मोकळी मैदाने ही सांभाळ करण्यासाठी / दत्तक योजना राबवून भाडेतत्वावर खाजगी संस्थांना देण्यात आली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ मध्ये शासनाने मैदानाबाबतची दत्तक योजना रद्द केलेली असताना तसेच उपरोक्त मैदानांचा भाडेकरार संपुष्टात आलेला असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची कांदिवली येथील जवळपास ३ ते ४ मोकळी मैदाने संबंधित खाजगी संस्थांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेली नसून या मैदानांचा खाजगी संस्थांकडून व्यावसायिक कारणांकरीता वापर करून दरमाह महानगरपालिकेच्या कोटयवधी रूपयांच्या महसूलाचे नुकसान करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कांदिवली येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मोकळया मैदानांवर टर्फ उभारून त्याचा व्यावसायिक वापर करणाऱ्या संबंधित खाजगी संस्थांकडून योग्य ती वसूली करून त्यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे, याप्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास त्याची कारणे काय असून याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे,
(५) असल्यास, उपरोक्त शासकीय भूखंडावर / मैदानांवर टर्फ उभारून व्यावसायिक वापर करण्याच्या घटनांमध्ये होत असलेली वाढ लक्षात घेता शासन याबाबत काही धोरण निश्चिती करणार आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची मुंबईतील एकूण २१६ मैदाने/उद्याने सन १९९९ पासून दत्तक तत्वावर देण्यात आली होती.
(२), (३) व (४) कांदीवली येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीची एकूण २५ मैदाने/उद्याने दत्तक तत्वावर देण्यात आली होती. त्यापैकी २० मैदाने/उद्याने ही शासनाने दत्तक तत्वावर देण्याबाबतच्या धोरणास स्थगिती दिल्याने महानगरपालिकेच्या ताब्यात परत घेण्यात आली आहेत. उर्वरित १ उद्यान व ४ मैदानांपैकी शाम नारायण ठाकूर स्कूल या संस्थेकडे असलेल्या न.भू.क्र.८०९/ए/१/७ या मैदानावर टर्फचा वापर करण्यात येत आहे. त्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सन २०२४-२५ च्या सुधारित दर सूचीनुसार दिनांक ०१/०३/२०२४ पासून भाडे वसुल करण्यात येत असून दिनांक ०१/०३/२०२४ ते दिनांक ३१/१२/२०२४ या कालावधीपर्यंत रुपये ५४२९० इतके भाडे वसुल करण्यात आले आहे. तसेच ३ मैदाने खेळण्यासाठी वापरली जात आहेत.
(५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या मनोरंजन मैदाने व क्रिडांगणे दत्तक तत्वावर देण्यासंदर्भात प्रारुप धोरणाबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेंतर्गत मोफत वैद्यकीय चाचण्या बंद असल्याबाबत

**(३५)** * **१८५४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाच्या माध्यमातून नामांकित प्रयोगशाळांशी करार करून १४७ वैद्यकीय चाचण्या मोफत केल्या जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध प्रयोगशाळांशी करण्यात आलेला कराराची मुदत संपल्यामुळे माहे डिसेंबर, २०२४ पासून मोफत चाचण्या बंद करण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोफत चाचण्या बंद झाल्यामुळे नागरिकांना खाजगी दवाखान्याच्या महागड्या चाचण्या कराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त दवाखान्यांमध्ये मोफत वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील १९० नियमित दवाखान्यांसाठी बाह्यस्रोत पध्दतीने रक्त चाचण्या तपासणीसाठी मार्च २०२३ पासून निविदेद्वारे कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये ८९ बेसिक रक्त चाचण्या व ४८ ॲडव्हान्स रक्त चाचण्या यांचा समावेश होता.या १९० नियमित दवाखान्यामध्ये आणखी २५० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यांची भर पडल्यामुळे डिसेंबर २०२४ पर्यंत रक्त चाचण्यांचे निविदेतील नमूद परिमाण संपुष्टात आले. त्यानंतर सदर कंत्राटदाराने सदर सेवा पुढे सुरु ठेवली नाही.

(३) हे खरे नाही.

(४)बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व नियमित दवाखाने व आपला दवाखान्यासाठी नामांकित प्रयोगशाळांशी केलेला करार दिनांक १५ डिसेंबर, २०२४ पासून संपुष्टात आल्यानंतर रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी बेसिक रक्त चाचण्या या दवाखान्यांच्या स्तरावर तर काही ॲडव्हान्स रक्त चाचण्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जवळच्या रुग्णालयातून मोफत करून घेण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. कोणत्याही रुग्णास खाजगी प्रयोगशाळेत चाचण्यासाठी पाठविण्यात येत नाही. तसेच नवीन कंत्राटदार नेमण्यासाठी निविदा महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोअर परळ (मुंबई) येथील रघुवंशी मिल परिसरातील व्यावसायिक गाळे अनधिकृत असल्याबाबत

**(३६) * २१११ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ग/दक्षिण विभागातील इमारती आणि कारखाने विभागाने केलेल्या परीक्षणात रघुवंशी मिल परिसर, लोअर परळ, मुंबई येथील ७५ टक्के व्यावसायिक गाळे अनधिकृत असल्याची बाब दिनांक ८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रघुवंशी मिल परिसरातील अधिकृत व्यावसायिक गाळेधारकांकडून रुपये १४० कोटींचा रुपयांचा मालमत्ता कर देखील थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कमला मिल दुर्घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी लोअर परळ येथील रघुवंशी मिल परिसरातील अनधिकृत व्यावसायिक गाळयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

रघुवंशी मिल, सी.एस. न. १०७, लोअर परेल विभाग, प्लॉट न. ११/१२, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३ च्या परिसरामध्ये ६१ इमारती असून सदर इमारतींमध्ये एकूण १८२ गाळे आहेत. त्यापैकी ७५ गाळयांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अंतर्गत अनधिकृत बांधकामाकरीता नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत सदर नोटीस धारकांनी महानगरपालिकेच्या कार्यवाहीच्या विरोधात मा.नगर दिवाणी न्यायालय तसेच मा.उच्च न्यायालयात दावा दाखल केला असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. माहे जानेवारी पासून रघुवंशी मिल परिसरामधील इतर गाळयांचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सर्वेक्षण सुरू आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत रघुवंशी मिल परिसरातील या १८२ गाळयांची मूळ मालमत्ता कर, दंड व शास्तीसह एकूण थकबाकी रुपये २३१.८७ कोटी इतकी होती.

(३) कर वसूलीकरीता सदर मालमत्तांपैकी मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २०२ ते २०६ मधील तरतुदीनुसार ८३ मालमत्तांवर अटकावणीची नोटीस (Schedule J) बजावण्यात आली असून जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. त्याद्वारे मालमत्ता कराची एकूण ८.०८ कोटी इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे. रघुवंशी मिल परिसरातील मालमत्तांवर कलम १५२अ नुसार आकारण्यात आलेल्या शास्तीच्या वसुलीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील बस थांब्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३७) * १३४५ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील लाखो प्रवाशांसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ आणि महानगरपालिकेच्या संयुक्त प्रयत्नाने उभारलेल्या हजारो स्टेनलेस स्टीलच्या बस थांब्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी,२०२५च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरात ४००० हून अधिक बस थांबे असून प्रत्येक थांब्यासाठी सात ते दहा लाख रुपये खर्च करून बांधलेल्या बस थांब्याच्या झालेल्या दुरवस्थेमुळे सदर थांबे विनावापर पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रवाशांच्या सोयी सुविधांसाठी या बस थांब्याची तातडीने दुरुस्ती करून प्रवाशांकरीता आवश्यक त्या ठिकाणी हे बस थांबे उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

काही बसशेडचे छत, बसण्याची व्यवस्था इ. कामांबाबत महामंडळाकडे तक्रारी येतात.

(२) हे खरे नाही.

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात (पुणे मनपा, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीए हद्द) मिळून एकूण ८६५ + १०० बस थांब्यांवर स्टेनलेस स्टिल बस शेड असून त्याचा वापर प्रवाशांमार्फत करण्यात येत आहे.

(३) परिवहन महामंडळामार्फत ताब्यातील बसशेडची दुरुस्ती कामे वेळोवेळी करण्यात येतात. महामंडळामार्फत नुकताच बसशेडचा सर्वे करण्यात आला असून त्यानुसार ३५ स्टेनलेस स्टिल बसशेडची दुरुस्ती करावयाची असून महामंडळामार्फत त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यात येणार आहे.

तसेच मेट्रो काम, महानगरपालिकेचे काम यासाठी महामंडळाच्या ताब्यातील बसशेड काढावे लागल्यास अथवा बस रुट बंद झाल्यास तेथील बसशेड इतर आवश्यक ठिकाणी पुन्हा उभारणी करण्याचे काम परिवहन महामंडळामार्फत वेळोवेळी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महानगरपालिकांच्या शाळांकरिता कोट्यवधी रुपयांचे शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यात येणार असल्याबाबत

**(३८)** * **११५३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महानगरपालिकेच्या शाळेत आकडेमोड आणि सामान्य वाचन तसेच इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांचे अंकगणित सुधारण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यात येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गणित, विज्ञान सारख्या महत्त्वाच्या विषयांसाठीच्या कायमस्वरूपी शिक्षकांच्या मासिक वेतनाचा हजारो रुपयांचा खर्च होत असताना त्यांच्याकडून शाळेत वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे अशा विषयांचा अभ्यास पक्का करून घेणे अपेक्षित असताना शिक्षकांची जबाबदारी एका कंपनीला देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, शहरातील अनेक मोठ्या कंपन्यांकडून महानगरपालिकेच्या शाळांसाठी सीएसआर योजनेंतर्गत वेगवेगळे उपक्रम तसेच शैक्षणिक साहित्य घेता येणे शक्य असतानाही महानगरपालिका खर्च करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे व याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे;
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

राज्यातील महानगरपालिकेच्या शाळेत आकडेमोड आणि सामान्य वाचन तसेच इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांचे अंकगणित सुधारण्यासाठी शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यात आलेले नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.